आय.सी.सी. २०-२० आंतरराष्ट्रीय कप क्रिकेट अंतर्गत व्हि. सी. ए. स्टेडियम जामठा, नागपूर येथे दि.०८ मार्च ते दि. २७ मार्च, २०१६ या कालावधीत झालेल्या आंतरराष्ट्रीय २०-२० क्रिकेट सामन्यांकरीता विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर यांचेव्दारे आगाऊ भरणा करण्यात आलेल्या उर्वरीत रकमेचा परतावा विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर यांना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः ईएनटी- २०१७/प्र.क्र.७९/टी-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख : २८ मार्च, २०१८

वाचा :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.ईएनटी-१०९९/प्र.क्र.२१५/टी-१, दिनांक २१.९.२०००.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.ईएनटी-१००७/प्र.क्र.२९/भाग-१/टी-१, दि.१४.६.२०१०
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. : ईएनटी-२०१६/प्र.क्र.२७/टी-१, दि. २४.०२.२०१६.
४) जिल्हाधिकारी, नागपूर यांचे क्र. क.क.नि./कार्या-२२/सिआर/कावि.-२१/२०१७,दि.२०.०१.२०१७ चे पत्र.
५) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांचे क्र.इएनटी/कार्या-२१(१)/कावि.-१६३/ २०१७, दि.०६.०६.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

आय.सी.सी.२०-२० आंतरराष्ट्रीय कप क्रिकेट अंतर्गत दि. ०८ मार्च, २०१६ ते दि.२७ मार्च, २०१६ या कालावधीत जामठा स्टेडियम, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या एकूण ११ आंतरराष्ट्रीय २०-२० क्रिकेट सामन्यांकरीता इंटरनेटद्वारे तिकीट आरक्षण करण्यास व तिकीट विक्री केंद्रावर संगणकीकृत तिकीट तसेच थेट तिकीट विक्री करण्याकरिता विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर यांना महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींनुसार तसेच संदर्भाधीन दि.२१.९.२००० व दि.१४.६.२०१० च्या शासन निर्णयांमधील तरतुदींनुसार संदर्भाधीन दि. २४.०२.२०१६ च्या शासन निर्णयांन्वये मान्यता देण्यात आली होती.

जामठा स्टेडियम, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या सदरहु आंतरराष्ट्रीय २०-२० क्रिकेट सामन्यांकरीता विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर यांचेव्दारे शासनाकडे आगाऊ भरणा करण्यात आलेल्या **रु.२,२२,७८,८७८/-** इतक्या रकमेमधून शासनास देय होणाऱ्या करमणूक शुल्काची रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम सचिव, विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर यांना परत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आय.सी.सी.२०-२० आंतरराष्ट्रीय कप क्रिकेट अंतर्गत दि. ०८ मार्च, २०१६ ते दि.२७ मार्च, २०१६ या कालावधीत जामठा स्टेडियम, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या एकूण ११ आंतरराष्ट्रीय २०-२० क्रिकेट

सामन्यांकरीता इंटरनेटद्वारे तिकीट आरक्षण करण्यास व तिकीट विक्री केंद्रावर संगणकीकृत तिकीट तसेच थेट तिकीट विक्री करण्याकरिता विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर यांना महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील तरतुदींनुसार तसेच संदर्भाधीन दि.२१.९.२००० व दि.१४.६.२०१० च्या शासन निर्णयांमधील तरतुदींनुसार संदर्भाधीन दि. २४.०२.२०१६ च्या शासन निर्णयांन्वये मान्यता देण्यात आली होती.

सदर सामन्यांकरीता विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर यांचेव्दारे शासनाकडे आगाऊ भरणा करण्यात आलेल्या **रु.२,२२,७८,८७८/- इतक्या रकमेमधून शासनास देय होणाऱ्या करमणूक शुल्काची रु.१,१५,५५,४७४/- इतकी रक्कम वजा करुन उर्वरित रु.१,०७,२३,४०४/- (अक्षरी रुपये एक कोटी सात लाख तेवीस हजार चारशे चार फक्त) इतक्या रकमेचा परतावा सचिव, विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर यांना "००४५, विक्रेय वस्तू व सेवा यांवरील इतर कर व शुल्क, वजा परतावे (००४५ ०२९४)" या लेखाशिर्षामधून करण्यास या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात येत आहे.**

सदर शासन निर्णय हा वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.-अनौसं ३०२/२०१७/व्यय-९, दि.०९/१०/२०१७ च्या अनुषंगाने तसेच वित्त विभागातील कार्यासन अर्थ-६ यांनी प्रस्तूत प्रकरणी दर्शविलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२८१७३४५५५४१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad Madhavrao Doke

Digitally signed by Sharad Madhavrao Doke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49a6844e93d7a1180c3226081e6f456ddf8d7b1bc67bc4bd78fa78029ab559db, cn=Sharad Madhavrao Doke
Date: 2018.04.12 14:49:32 +05'30'

(शरद डोके)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) अप्पर मुख्य सचिव (वित्त विभाग), मंत्रालय, मुंबई.
५) विभागीय आयुक्त, नागपूर.
६) जिल्हाधिकारी, नागपूर.
७) अपर जिल्हाधिकारी (करमणूक शुल्क), नागपूर.
८) प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.

९) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई/नागपूर.

१०) सचिव, विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर.

११) प्रधान सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२) सह सचिव (कार्यासन ब-१ चे नियंत्रक अधिकारी), महसूल व वन विभाग , मंत्रालय, मुंबई.

१३) उप सचिव (टी-१ कार्यासनाचे नियंत्रक अधिकारी), महसूल व वन विभाग , मंत्रालय, मुंबई.

१४) निवड नस्ती, टी-१.